# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.03.2026** **वारःमंगळवार**

---

पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विविध देशांच्या राष्ट्रप्रमुखांशी चर्चा

इस्राइल इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सर्व राज्यांना सावधगिरी बाळगण्याचं केंद्राचं आवाहन
दुबई आणि अबू धाबीहून भारताकडे येणारी विमानसेवा अंशतः पुन्हा सुरू

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज अर्थसंकल्पोत्तर दुसऱ्या वेबिनारला संबोधित करणार
आणि

ऑल इंग्लंड बॅडमिंटन चॅम्पियनशिप स्पर्धेला आजपासून सुरुवात; भारताचे 12 खेळाडू सहभाग घेणार

**<u>मोदीसौदी</u>**

पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सौदी अरेबियाचे युवराज आणि पंतप्रधान - मोहम्मद बिन सलमान यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. सौदी अरेबियावरील हल्ल्यांचा मोदींनी निषेध केला आहे. प्रादेशिक शांतता आणि स्थैर्य लवकरात लवकर पुनःप्रस्थापित करणं अत्यंत महत्त्वाचं आहे; यावर दोन्ही बाजूंनी सहमती दर्शविली. या कठीण काळात भारतीय समुदायाच्या कल्याणाची काळजी घेतल्याबद्दल पंतप्रधानांनी सलमान यांचे आभार मानले.

बहरीनचे राजे हमाद बिन इसा अल खलिफा यांच्याशीही पंतप्रधान मोदींनी दूरध्वनीवरून संवाद साधला. बहरीनवरील हल्ल्यांचा निषेध करताना मोदी म्हणाले की, या कठीण काळात भारत आपल्या जनतेसोबत एकजुटीने उभा आहे. देशातील भारतीय समुदायाला दिलेल्या दृढ पाठिंब्याबद्दल त्यांनी बहरीनच्या राजांचे आभार मानले.

पंतप्रधानांनी जॉर्डनचे राजा अब्दुल्ला द्वितीय यांच्याशीही दूरध्वनीवरून संवाद साधत या भागातील बदलत्या परिस्थितीबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. जॉर्डनमध्ये शांतता, सुरक्षा प्रस्थापित व्हावी असं सांगत या कठीण काळात जॉर्डनमधील भारतीय समुदायाची काळजी घेतल्याबद्दल त्यांनी राजाचे आभार मानले.

हल्ले

इस्रायलच्या हवाई दलाने अमेरिकेसह केलेल्या संयुक्त कारवाईत इराणच्या ३१ पैकी २४ प्रांतांमध्ये हल्ले केले असल्याचं इस्रायलच्या हवाई दलाने म्हटलं आहे. इराणने बहरीन, इराक, जॉर्डन, कुवेत, ओमान, कतार, सौदी अरेबिया आणि युएईसह नऊ देशांवर हल्ले केले आहेत.

रेड क्रेसेंटच्या मते, अमेरिका-इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात इराणमध्ये ५५५ लोक मारले गेले. मिनाब इथल्या मुलींच्या प्राथमिक शाळेवर झालेल्या सर्वात भीषण हल्ल्यात सुमारे १८० मुली मृत्युमुखी पडल्या. इराणी माध्यमांच्या वृत्तानुसार इराणचे दिवंगत सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या पत्नीचाही मृत्यू झाला आहे. इस्रायलमध्ये, बेट शेमेश इथे इराणी बॅलिस्टिक क्षेपणास्त्राच्या हल्ल्यात नऊ जण ठार तर २० पेक्षा अधिक जण जखमी झाले.

पश्चिम आशियातील परिस्थिती लक्षात घेता केंद्राने राज्यांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. प्रक्षोभक उपदेश देणाऱ्या इराण समर्थक कट्टरपंथी उपदेशकांची ओळख पटवण्यास सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना सांगण्यात आलं आहे . कायदा आणि सुव्यवस्था बिघडू नये म्हणून गुप्तचर माहितीची देवाणघेवाण आणि प्रतिबंधात्मक कारवाईच्या तीव्र गर्जेवर या पत्रात भर देण्यात आला आहे.

**<u>विमानेरद्द</u>**

पश्चिम आशियातील सध्याच्या परिस्थितीमुळे, भारताकडून नियोजित ३५७ विमान उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. प्रवाशांना दिलासा मिळावा यासाठी या प्रदेशातील परिस्थितीचं बारकाईनं निरीक्षण केलं जात असल्याचं नागरी उड्डाण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>दुबईविमानसेवा</u>**

दरम्यान पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दुबई आणि अबू धाबीहून भारताकडे येणारी विमानसेवा गेल्या काही दिवसांपासून बंद होती, ही विमानसेवा काल रात्रीपासून अंशतः पुन्हा सुरू झाली आहे. या निर्णयामुळे संयुक्त अरब अमिरातीमध्ये अडकलेल्या हजारो भारतीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. दुबई आणि अबू धाबीकडून दिल्ली, मुंबई आणि बेंगळुरूकडे काही प्रमाणात विमानसेवा सुरू करण्यात आली असल्याचं दुबई मीडिया ऑफिसनं आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. दरम्यान, संबंधित विमान कंपनीकडून विमान उड्डाणाबाबतची निश्चित माहिती मिळाल्याशिवाय प्रवाशांनी विमानतळावर जाऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

**<u>मोदीबजेट</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ‘शाश्वत आणि मजबूत आर्थिक विकास ' या विषयावर व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला संबोधित करतील.

औद्योगिक विस्ताराला चालना देण्यासाठी, तांत्रिक प्रगतीला चालना देण्यासाठी आणि प्रमुख क्षेत्रांचा पाया मजबूत करण्यासाठी केल्या जाणाऱ्या दूरदर्शी सुधारणांवर यावेळी चर्चा केली जाईल. चर्चा प्राधान्यक्रमांना प्रभावी कृतींमध्ये रूपांतरित करण्यावर या चर्चा सत्रात भर दिलं जाईल तसंच उद्योगांमधील सहभागींच्या प्रत्यक्ष अनुभवांमधून घेतलेलं मार्गदर्शन प्रभावी अंमलबजावणीसाठी मदत करेल, असं पंतप्रधान कार्यालयानं महलतं आहे.

**<u>भारतकॅनडा</u>**

भारत आणि कॅनडा यांनी काल महत्त्वाच्या खनिज सहकार्य, अक्षय ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देणे आणि सांस्कृतिक सहकार्य यासह विविध क्षेत्रांमधल्या तीन करारांची देवाणघेवाण केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्यात नवी दिल्ली इथे काल झालेल्या चर्चेनंतर या करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. दोन्ही नेत्यांनी भारत-कॅनडा धोरणात्मक भागीदारीच्या विविध क्षेत्रांमध्ये आतापर्यंत झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला. पश्चिम आशियातील सध्याची परिस्थिती ही गंभीर आणि चिंतेची बाब असून भारत संवाद आणि राजनैतिक मुत्सद्देगिरीतून सर्व वाद सोडवण्यासाठी पाठिंबा देत असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी चर्चेनंतर झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितलं. भारत आणि कॅनडाने २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार ५० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचं महत्त्वाकांक्षी उद्दीष्ट ठेवलं आहे असं मोदी म्हणाले.

**<u>अमितशहा</u>**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी काल पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील रायदीघी इथून भारतीय जनता पक्षाच्या "परिवर्तन यात्रे" ची सुरुवात केली. पश्चिम बंगालमधील लोक सत्ताधारी तृणमूल काँग्रेसमुळे त्रस्त झाले असून आता त्यांना परिवर्तन हवं असल्याचं शहा यावेळी बोलताना म्हणाले.
हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

होळी पौर्णिमेचा सण काल संपूर्ण देशासह महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीनं साजरा करण्यात आला. महाराष्ट्रात दुर्गम आदिवासी भाग असो की कोकणातील छोटी मोठी गावं सर्वच भागात त्या त्या ठिकाणच्या प्रथा परंपरानुसार शिमगोत्सव साजरा करण्यात आला.
होलिका दहनानंतर आज सर्वत्र धूलिवंदनाचा उत्साह असेल. महाराष्ट्राच्या अनेक भागात धुळवडीला तर काही भागात रंगपंचमीच्या दिवशी रंगोत्सव साजरा केला जातो.

**<u>रेल्वेहोळी</u>**

होळीच्या सणासाठी भारतीय रेल्वेने तयारी केली आहे. प्रमुख स्थानकांवर प्रवाशांच्या गर्दीचे सतत निरीक्षण करून, आज २२ विशेष गाड्या चालवण्याचेही नियोजन आहे.

**<u>आंध्रएआय</u>**

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी अधिकाऱ्यांना सर्व विभागांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून प्रशासकीय कार्यक्षमता वाढविण्याचे निर्देश दिले आहेत. प्रशासन आणि सार्वजनिक सेवा वितरण सुधारण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे असं त्यांनी सांगितलं. काल अमरावती इथे सरकारी सेवांबद्दलच्या जनतेच्या धारणांचा आढावा घेताना, मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना ड्रोन, सीसीटीव्ही कॅमेरे आणि उपग्रह स्रोतांकडून डेटा एकत्रित करण्यासाठी एक मजबूत यंत्रणा स्थापन करायला सांगून प्रभावी डेटा एकत्रीकरणावर लक्ष देण्याबदल सांगितलं. दरम्यान फटाके उत्पादक कारखान्यांमध्ये होणारे स्फोट रोखण्यासाठी, त्यांनी अधिकाऱ्यांना तामिळनाडूतील शिवकाशीला भेट देऊन सुरक्षा पद्धतींचा अभ्यास करण्याचेही निर्देश दिले.

**<u>स्फोट</u>**

नागपूरमधील स्फोटक निर्मिती कारखान्यातल्या स्फोटात मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या 19 झाली असून 23 जखमींपैकी 13 जणांची प्रकृती गंभीर आहे. पोलिसांनी या कंपनीच्या २१ संचालक आणि भागधारकांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला असून 11 संचालकांना अटक केली आहे.

या दुर्घटनेचा आढावा घेण्यासाठी नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. प्रत्येक मृताच्या कुटुंबाला ७५ लाख रुपये आणि जखमींना २५ लाख रुपये भरपाई देण्याचे निर्देश बावनकुळे यांनी कंपनीला दिले आहेत.

**<u>Badminton</u>**

इंग्लंडमधील बर्मिंगहॅम इथं आजपासून सुरू होणाऱ्या All England Badminton Championships स्पर्धेत भारताचा १२ सदस्यीय संघ पाचही प्रकारांत सहभागी होत आहे.

अमेरिका-इराण संघर्षामुळे आखाती हवाई क्षेत्र बंद झाल्याने ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू ही दुबईमध्ये अडकली असून ती या स्पर्धेला मुकणार आहे. सिंधूच्या अनुपस्थितीत भारताच्या कामगिरीची जबाबदारी आता लक्ष्य सेन याच्यावर असेल.

पुरुष एकेरीत लक्ष्य सेनचा सामना पहिल्याच फेरीत चीनच्या जागतिक शी यू ची याच्याशी होणार आहे.

महिला एकेरीत मालविका बनसोड हिच्यासमोर चीनच्या चेन यूफेई हिचे कडवे आव्हान असेल. तर उन्नती हुड्डा हिचा सामना थायलंडच्या आठव्या मानांकित पोर्नपावे चोचुवोंग हिच्याशी होणार आहे.

सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांची जोडी उद्या मलेशियाच्या प्रतिस्पर्ध्या विरुद्धह खेळातील

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागाने आज अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयात विजांसह वादळांचा अंदाज वर्तवला असून सिक्कीममध्ये सकाळच्या वेळी दाट धुके राहील. येत्या चार दिवसांत वायव्य भारतातील मैदानी प्रदेशातल्या  कमाल तापमानात दोन ते चार अंश सेल्सिअसने वाढ होण्याचा अंदाज आहे.

# या बरोबरच हे बातमीपत्र संपलं नमस्कार.